# दावं

(कथासंग्रह)

ह. मो. मराठे

रिया पब्लिकेशन्स्

**दावं : ह. मो. मराठे**

**© ह. मो. मराठे**
ओ-६०७, पिनाक मेमरीज (२)
हॉटेल कोकण, एक्स्प्रेस गल्ली,
कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११०३८
फोन : (०२०) २५४३७५३०, मो. : ९४२३०१३८९२

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ओंकार ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये २००/-

## मनोगत...

'दावं' या माझ्या कथासंग्रहाची ही तिसरी आवृत्ती.

पहिली आवृत्ती 'सन पब्लिकेशन्स'ने १९७७ च्या सुमारास प्रसिद्ध केली होती. दुसरी आवृत्ती 'लोकसाहित्य' प्रकाशनतर्फे १९९८ मध्ये निघाली. आता २००९ मध्ये तिसरी आवृत्ती 'अजब पब्लिकेशन्स' तर्फे श्री. शीतल मेहता प्रसिद्ध करीत आहेत.

यातील काही कथा 'आजची नायिका' या मी लिहिलेल्या आणि मुंबई दूरदर्शनवरून १९९२ च्या सुमारास प्रक्षेपित झालेल्या मालिकेत समाविष्ट होत्या. 'आजची नायिका' मालिकेमधील कथांचा स्वतंत्र संग्रह निघाला आहे. तसेच 'ह. मो. मराठे यांच्या सर्वोत्कृष्ट कथा' या पुस्तकातही यातील काही कथा समाविष्ट आहेत. त्याच त्याच कथा वेगवेगळ्या संग्रहात हमो घुसवतात, असा आरोप वाचकांनी करू नये, त्यासाठी हा खुलासा करीत आहे.

माझ्या पक्षिणी, दावं, घोडा, वीज, युद्ध, सापेक्ष ज्वालामुख, बिग बॉस इ. संग्रहांच्या दुसऱ्या, तिसऱ्या आवृत्त्या निघत आहेत. वेगवेगळे प्रकाशक त्या प्रसिद्ध करीत आहेत. मी ३०-३५ वर्षांपूर्वी लिहिलेल्या कथा वाचायला वाचक अजूनही उत्सुक आहेत असाच अर्थ मी करतो. त्यामुळे लेखक म्हणून समाधान वाटते.

**- ह. मो. मराठे**
ओ : ६०७, पिनाक मेमरीज (२),
हॉटेल कोकण एक्स्प्रेस गल्ली,
कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११०३८
फोन : (०२०) २५४३७५३०, मो. : ९४२३०१३८९२

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | भूमिका | ... | ७ |
| २. | कापुरुष | ... | २५ |
| ३. | वाल्या कोळी व बायको | ... | ४८ |
| ४. | दावं | ... | ६१ |
| ५. | कृमी | ... | ७७ |
| ६. | भीमाशंकर चाळीतील जोशीकाकू | ... | १०२ |
| ७. | ससा | ... | ११८ |
| ८. | देऊळ | ... | १३० |
| ९. | समाधी | ... | १४६ |
| १०. | विहीर | ... | १७८ |

# भूमिका

आपला प्रोजेक्ट बंद करण्यात येणार असल्याचं तिनं बऱ्याच दिवसांपूर्वी ऐकलं होतं, पण आज सकाळी ऑफिसात आल्या-आल्या तिला ती बातमी अगदी खात्रीशीर स्वरूपातच कळली. तिचे सीनिअर कलीग डॉ. श्रीखंडेच तिला म्हणाले, ''शेवटी आपली बातमी खरी ठरणार, मिसेस प्रभुणे !''

हे शब्द उच्चारताना डॉ. श्रीखंडे जेवढे धास्तावलेले दिसत होते त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात ती धास्तावली. पहिल्यांदा तिनं याबद्दलची कुणकुण ऐकली तेव्हा तिच्या मनात चर्रर् झालं होतं; पण एक आशा तिच्या मनात धुगधुगत होती... प्रोजेक्ट बंद न करता चालू ठेवीलच कंपनी. शेवटी एका मोठ्या उद्योगसमूहाची प्रतिष्ठा त्या प्रोजेक्टशी निगडित आहे.

ती काम करीत असलेला प्रोजेक्ट उद्योगसमूहानं आपल्या प्रतिष्ठेसाठी सुरू ठेवावा अशी तिची अपेक्षा होती, पण उद्योगसमूहाला प्रोजेक्ट चालू ठेवण्याची काही गरज नव्हती. गरज होती ती तिला, तिच्याप्रमाणंच त्या प्रोजेक्टमध्ये काम करणाऱ्या आठ-दहा जणांना. ती स्वतः, तिचे तीन कलिग्ज, एक-दोन टायपिस्ट पोरी, फिल्ड वर्कर्स, शिपाई आणि इतर नोकरवर्ग... स्वतः प्रोजेक्ट-इनचार्ज श्रीनिवासन यांनासुद्धा. ते तर दिल्लीतला आपला जाब सोडून या प्रोजेक्टचे इनचार्ज

म्हणून आले होते. श्रीखंडे किंवा इतर लोक, तशीच ती स्वतःसुद्धा असेच आपले पूर्वीचे जॉब सोडून या प्रोजेक्टकडं आले होते. 'प्रोजक्ट तिला इंटरेस्टिंग वाटला होता. झपाट्यानं वाढणाऱ्या कारखान्यांच्या परिसरातील मनुष्य जीवनाचा अनेक अंगांनी अभ्यास करायचा...विशेषतः कामगारवर्गाचा. तेथील सामाजिक वातावरणाचा, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रश्नांचा, पर्यावरणाच्या दूषितिकरणाचा. उद्योगसमूहानं पैसे दिलेले होते. संस्था स्थापन करून फंड उभा करण्यात आला होता. हा प्रोजेक्ट राबविला जात होता. ती स्वतः कामात रस घेणारी होती. तिला तिथं काम मिळून गेलं होतं. वेतन बऱ्यापैकी होतं. इतर फॅसिलिटीज् फार नव्हत्या; पण काम आवडीचं होतं. वेगळं होतं. आपली पूर्वीची नोकरी सोडून ती संस्थेत आली होती. आठ-दहा वर्षे मजेत गेली होती.

पण आता संस्थेनं सर्वांसमोरच प्रश्न उभा केला होता. उद्योगसमूहाकडून मिळणारा पैसा आता दुसऱ्या प्रकारच्या कामाकडं वळणार होता, ती काम करीत असलेली संस्था नावानं अस्तित्वात राहणार होती; पण कारखान्याच्या परिसरातील मनुष्यजीवनाचा अभ्यास करणारा प्रोजेक्ट स्थगित करण्यात येणार होता. चार-सहा महिन्यांपूर्वी उडत-उडत ही बातमी त्यांच्या कानावर आली होती. आज डॉ. श्रीखंड्यांनी ती कन्फर्म केली होती. अजून अधिकृत पत्र यायचं होतं. पण उद्योगसमूहाच्या डायरेक्टर बोर्डानं फंडस् दुसरीकडं वळविण्याचा निर्णय घेतला होता आणि ती बातमी डॉ. श्रीखंड्यांना अगदी माहितगार गोटातून कळली होती. धास्तावलेल्या स्वरात त्यांनी ती तिला सांगितली होती.

नेहमीप्रमाणं ती इतर बहुतेकांच्या आधी आली होती. त्याबद्दल तिचा कटाक्षच असे. कधीही ठरलेल्या वेळापेक्षा उशीर करावयाचा नाही. उशीर झाला असता तरी तिला कोणी बोललं नसतं किंवा कामही अडलं नसतं, पण उशिरा येणं किंवा कामाची जबाबदारी टाळणं तिला कधीच मंजूर नसे. संस्थेच्या कामाची जी जबाबदारी संस्थेनं आपल्यावर सोपवली, ती सर्व शक्तिनिशी पार पाडावयाची. ऑफिसात वेळेवर पोहोचण्यासाठी ती प्रत्येक दिवशी अगदी पहाटेपासून धडपडे. स्वयंपाक स्वतः करी. तो करता करता पोरांच्या अभ्यासावर लक्ष ठेवी. केरवारे स्वतः करी. मुलांना जेवायला वाढून, त्यांचे डबे आणि खाणी तयार करून ठेवून ती ठरलेल्या वेळी ऑफिसात पोहोचे. त्यावेळी तिच्याखेरीज आणखी कोणी क्वचित



येऊन पोहोचलेला असे. ती फिल्डवर्कसाठी ऑफिसच्या बाहेर पडे तेव्हाही ठरलेल्या वेळी ठरलेल्या ठिकाणी पोहोचे.

आज ती ऑफिसात पोहोचली तेव्हा तिच्या आधी फक्त डॉ. श्रीखंडे तेवढे येऊन पोहोचले होते व आल्या-आल्या त्यांना ती बातमी तिला ऐकविली होती. काही महिन्यांपूर्वी उडतशी बातमी ऐकल्यापासून तिनं मनाची तयारी केलीच होती आणि अंतिमतः जेव्हा ही बातमी ऐकावी लागेल तेव्हा फार मानसिक धक्का आपणाला बसणार नाही असा तिचा अंदाज असूनही श्रीखंड्यांनी दिलेली बातमी ऐकताच ती धास्तावून गेली.

''म्हणजे आपणाला जी थोडीशी आशा वाटत होती...'' ती पुटपुटली.

''तीही संपली. कालच मला कळलं, सांगितलं ना ! '' डॉ. श्रीखंडे म्हणाले.

ती आपल्या जागेकडे गेली. पर्स टेबलावर ठेवून खुर्चीत बसली... खूप दमून गेलेली असल्याप्रमाणं....

तिला असं दमून गेल्यासारखं कधी वाटत नसे. तसं आपणाला वाटता कामा नये असं तिनं स्वतःला शिकवलं होतं. लग्नाला वीस वर्षे होऊन गेली होती. या काळात कितीतरी असे क्षण येऊन गेले, जेव्हा आपण खूप खूप दमून गेल्याप्रमाणं तिला वाटायला हवं होतं; पण ते ते सर्व क्षण तिनं समर्थ होऊन पेलले होते. पण खुर्चीवर बसल्या बसल्या तिला वाटलं; आता हा क्षण आपल्यानं पेलवणार नाही. ताकदच नाही उरली आपल्यात ती. संपून गेलीय सगळी शक्ती, इतक्या सगळ्या भूमिका पार पाडताना, आई-वडिलांना आधार देणाऱ्या मुलीची, प्रेयसीची, बहिणीची, आईची, बायकोची, अभ्यासिकेची, संशोधिकेची, नोकरदाराची आणि आता पुन्हा एकदा बेकार झालेल्या एका सुशिक्षिताची. ही बेकारी कोणत्या वयात? पन्नाशीला टेकल्याच्या.

ती तिच्या आई-वडिलांची एकुलती एक मुलगी होती. हुशार होती आणि वडिलांची इच्छा तिनं खूप शिकावं अशी होती. म्हणून ती शिकत राहिली. शिक्षण झाल्यावर तिला नोकरी मिळाली. घराशेजारी होती, आई-वडिलांच्या जवळ होती म्हणून तिनं स्वीकारली. वडिलांनी लग्नाची बोलणी चालविली तेव्हा म्हणाली, 'माझं लग्न हा तुमच्या काळजीचा विषय व्हावा असं मला वाटत नाही; तो माझा प्रश्न आहे, मला जेव्हा सोडवायचा तेव्हा सोडवीन.' ती प्रश्न सोडवताना एक

खबरही घेणार होती... उत्तर सरळ असावं... गुंतागुंतीचं नसावं. प्रश्न सोडवता सोडवता अधिक प्रश्न निर्माण करणारं नसावं.

श्रीधर तिला भेटला. तिला आवडला. तो तिच्या मते एक होतकरू तरुण होता. कुठंतरी नोकरी करीत होता. पण नोकरी करणं आणि नोकरी संपली की निवृत्त होणं, हेच काही ध्येय नव्हतं. त्याला काहीतरी कार्य करायचं होतं.... समाजसेवेच्या स्वरूपाचं, सांस्कृतिक कार्याच्या स्वरूपाचं. राजकीय कामसुद्धा. ते तिला पटलं, आवडलं. त्याचं वेगळेपणही तिला जाणवून गेलं.

लग्न करायचं ठरल्यानंतर ती त्याला म्हणाली, ''तू आमच्याच घरी ये राहायला. अगदी घरजावई म्हणून नव्हे; पण घर मोठं आहे. आई-वडिलांनाही गरज आहे. मी तुझ्याकडं आले काय, किंवा तू माझ्याकडं आलास काय...''

पण त्याला ते पसंत नव्हतं.

ती त्याला म्हणाली, ''ओके! आपण तुझ्या किंवा माझ्याही आई-वडिलांकडं न राहता, तिसरीकडंच राहू.''

त्यानं म्हटलं, ''तू निर्णय घेशील तो मला मान्य आहे.''

लग्न करून आई-वडिलांचं घर सोडतानाच तिनं पगाराचे साठवलेले पैसे, आईवडिलांकडे सुपूर्द केले.

हे तिनं त्याला सांगितलं तेव्हाही तो म्हणाला, ''तू घेशील तो निर्णय मला मान्य आहे.''

पुढंही तो असंच म्हणत राहिला. सगळे निर्णय तीच घेत राहिली. बिऱ्हाडासाठी जागा बघण्याचा, घरातलं एवढं-एवढं सामान खरीदण्याचा. पाहुण्यारावळ्यांच्या आगत-स्वागताचा, नातेवाइकांना भेटी देण्याचा. घराला रंग कोणता द्यावा याचा. त्याचं नोकरीत लक्ष नाही आणि भागातही नाही... त्याच्या पगारात, म्हणून नोकरीही सुरूच ठेवण्याचा. मुलं होण्याच्या आणि दोन मुलं झाल्यानंतर ती थांबविण्याचा. त्यांच्या शिक्षणाचा. त्यांच्या अभ्यासाचा. परीक्षांत मुलांनी सतत वरच्या क्रमांकावरच राहिलं पाहिजे याचा. त्यांचा पुढील व्यावसायिक अभ्यासक्रम ठरवून देण्याचा. भाड्याच्या जागेत कटकटी होतात, म्हणून स्वतःच्या नावावर कर्ज काढून ओनरशिप ब्लॉक घेण्याचा. श्रीधरनं अचानकच नोकरी सोडून दिली तेव्हा आपणाला कायमपणे नोकरी करीतच राहिलं पाहिजे याचा-असे संसारातले, आयुष्यातले सगळे महत्त्वाचे निर्णय तिनंच घेतले होते.



निर्णय घेतले होते आणि त्याच्या पाठोपाठ येणाऱ्या काळज्या आणि जबाबदाऱ्या यांची ओझी पण स्वतःच्याच शिरावर घेतली होती. दमून जायला होईपर्यंत वाहिली होती.

तिला अनेकदा वाटे... श्रीधरनं यातली काही ओझी पेलायला हवी होती. यातल्या काही जबाबदाऱ्या घ्यायला हव्या होत्या. काही निर्णयही घ्यायला हवे होते. कुटुंबातला प्रमुख घटक म्हणून; पुरुषाच्या तालानं चालणाऱ्या भारतीय कुटुंब संस्थेतील स्त्रियांचा तिला कधीकधी हेवा वाटे. या बायकांचं आयुष्य किती निश्चिंत असतं. सगळे निर्णय पुरुषानं घ्यावयाचे आणि निर्णय घेण्यामुळं येणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या, सर्व काळज्या यांची ओझीसुद्धा त्यांनीच वाहायची. आपल्या वाट्याला मात्र इतर अनेक भूमिकांबरोबर हीही भूमिका आली कर्त्या कुटुंबप्रमुखाची. महत्त्वाचे निर्णय घेण्याची, त्यामुळं येणाऱ्या काळज्या स्वतःच वाहण्याची. त्यामुळं थकून-भागून जाण्याची.

टेबलावर डोकं ठेवून कधीच्या आपण बसलो होतो, हे तिच्या लक्षात आलं ते ऑफिसातले इतर सहकारी येऊन आवाज वाढला तेव्हा. ती एकदम जागी झाली आणि लज्जित झाल्याप्रमाणं सावरून बसली.

''काय हो मिसेस प्रभुणे, आज ऑफिसात आल्या-आल्याच झोप?'' कोणीतरी म्हणालं. या उद्गारामुळं तर ती अधिकच खजील झाल्यागत उठली आणि वॉश घेऊन आली. कामाकडं वळली.

पण कामाकडं तिचं लक्ष लागत नव्हतं. इतरही कोणाचं लागत नव्हतं. सगळ्यांच्या चर्चेचा एकच विषय होता. प्रोजेक्ट लवकरच बंद करण्यात येणार याचा. डॉ. श्रीखंडे यांनी आणलेली बातमी त्यांनी सर्वांनाच सांगितली होती. ती निश्चित स्वरूपाची बातमी ऐकण्यात आल्यानंतर सर्वांना एकच वाटत होतं... उपजीविकेचं दुसरं काहीतरी साधन पाहिलं पाहिजे.

डॉ. गोसावींनी स्वतःच अशा स्वरूपाचा एक खाजगी प्रोजेक्ट सुरू करायचं ठरवलं होतं, ते त्यांनी बोलता-बोलता जाहीर केलं. अशा प्रकारच्या प्रकल्पांसाठी मोठमोठ्या देणग्या कसकशा मिळवायच्या, या तंत्रात ते पारंगत होते. डॉ. श्रीखंडे एका कॉलेजात प्रिन्सीपॉल म्हणून जाण्याच्या प्रयत्नात होते. श्रीनिवासन आपल्या आधीच्या दिल्लीच्या संस्थेत पुन्हा प्रयत्न करण्याच्या विचारात होते. ज्युनिअर इन्व्हेस्टिगेटर्स काळजीत होते. पण आपण या प्रकल्पात नोकरीला आलो ते केवळ